आतील पानात वाचा
- इतर वेळेच्या फटाके बाजीवर देखील बंदी घाला...
- भारतात ३ मोठी मेट्रो शहरे...
- मळगंगा संस्थेच्या अध्यक्षांसह २३ जणांविरुध्द गुन्हा !

दैनिक अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**
दुःखी माणसाला मदत करण्यासाठी लांबवलेला एक हात प्रार्थने साठी जोडलेल्या दोन हातां पेक्षा अधिक उपयुक्त आहे...
– स्वामी विवेकानंद

वर्ष : ०५ | अंक : ८६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.०९ नोव्हेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# ‘महाविकास आघाडी’ स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक एकत्र लढणार

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.०८, कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्ह्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठी महाविकास आघाडीने एकत्रित लढण्याचा निर्णय अधिकृतपणे जाहीर केला आहे. काल शुक्रवारी रोजी अजिंक्यतारा कार्यालयात काँग्रेस, शिवसेना (ठाकरे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत हा ठराव मंजूर झाला. बैठकीनंतर देण्यात आलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यातील सर्व नगरपालिका, नगरपंचायती, जिल्हा परिषद, पंचायत समिती, तसेच महानगरपालिका निवडणुका महाविकास आघाडी म्हणून एकसंघपणे लढल्या जाणार आहेत. विधानपरिषदेचे गटनेते आमदार सतेज पाटील तसेच माजी खासदार विनायक राऊत यांच्या उपस्थितीत हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.

**सक्षम उमेदवारीवर देणार भर**
या बैठकीमध्ये उमेदवार निवडताना नुसते पक्षीय हित न पाहता निवडून येण्याची क्षमता, सामाजिक व आर्थिक आधार, आणि पुरेसा सम न्वय अशा निकषांवरच जागा दिल्या जातील, असा ठाम निर्धार करण्यात आला. जागावाटपाचा अंतिम निर्णय स्थानिक पातळीवर प्रत्येक घटक पक्षाचे जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष चर्चे तून सामोपचाराने घेणार आहेत. कुठे तिढा आला, तर तो निर्णय आमदार सतेज पाटील यांच्या माध्यमातून घेतला जाणार आहे.

**दोन दिवसांत विशेष बैठक**



या बैठकीनंतर स्वाभिमानी शेतकरी संघटना आणि इंडिया आघाडीतील घटक पक्षांना औपचारिकरित्या आघाडीम ध्ये सामील करण्यासाठी पुढील दोन दिवसांत खासदार शाहू छत्रपती यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक घेण्यात येणार आहे, अशी माहितीही देण्यात आली. त्यामुळे जिल्ह्यात महायुतीच्या तुलनेत महाविकास आघाडी व इंडिया आघाडीचे गट एकजुटीने विरोधात येण्याच्या तयारीत आहेत.

**कार्यकर्त्यांमधील उत्साही वातावरण...**
राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार डिसेंबर म हिन्यात कोल्हापूर जिल्ह्यातील १३ नगरपालिका, पाच नगरपंचायती, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांचे बिगुल वाजले आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवर उमेदवारांची चाचपणी, गटांतर्गत समन्वय, आगामी प्रचार आणि कार्यकर्त्यांमधील नवा उत्साह दिसून येतो आहे.

**विरोधकांची सत्ता मोडण्यासाठीच एकी...**
या निर्णयामुळे, स्थानिक स्तरावरील जागावाटप, उमेदवारी, आणि आघाडी धर्माशी प्रामाणिक राहून प्रचार करण्यावर महाविकास आघाडीचा कटाक्ष राहणार आहे. सर्व नेत्यांनी बैठकीत विरोधकांना रोखण्यासाठी संपूर्ण जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी पक्षीय भेद विसरून आघाडीच्या झेंड्याखाली काम करावे, असा संदेश दिला आहे.

दरम्यान, या बैठकीसाठी कोल्हापुरातील अजिंक्यतारा कार्यालयात काँग्रेसचे आमदार सतेज पाटील, माजी खासदार विनायक राऊत, आमदार सुनील प्रभू, माजी आमदार राजीव आवळे, शिवसेना संपर्क प्रमुख अरुण दुधवडकर, नितीन बानुगडे-पाटील, विजय देवणे, राष्ट्रवादी काँग्रेसचे व्ही. बी. पाटील, सचिन चव्हाण, अन्य जिल्हा व शहर स्तरावरील नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## ‘सोयगाव नगरपंचायत’ वर काळी जादू !
### निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काळ्या जादूचे प्रयोग ?



**अक्षराज : पुनम परदेशी**
**दि.०८, सोयगाव (छ. संभाजीनगर) :** सोयगाव नगरपंचायत मध्ये टाचण्या टोचलेली काळी बाहुली सुपारी बांगड्या आदी वस्तू गाडलेल्या अवस्थेत सापडल्या कुणीतरी काळी जादू टोणा करण्यासाठी हे सगळं केलं असावे परंतु हे नेमकं केलं कुणी आणि कशासाठी याविषयी सोयगाव शहरात चर्चा सुरु आहे. सोयगाव गलवाडा रोडवर नगर पंचायत कार्यालय आहे. आज नगर पंचायत चे कर्मचारी सिसिटीव्ही कॅमेरा बसविण्यासाठी केबल टाकण्यासाठी खोदकाम करीत असतांना हा प्रकार उघडकीस आला. अचानक घडलेल्या प्रकाराम ुळे कर्मचाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली. याविषयी माहिती मिळताच नगरसेवक बंटी काळे, संतोष बोडखे, राजू दुतोंडे, गजानन कुडके यांनी नगर पंचायत कार्यालयात जाऊन हा सगळा प्रकार पाहिला. हा सगळा प्रकार पाहून सर्व जण चकित झाले. हे असं नेमकं कुणी केलं असेल कशासाठी केलं असेल याविषयी चर्चेला उधाण आलेले आहे. नगरपंचायत मध्ये असलेल्या सिसिटीव्ही कॅमेरा मध्ये हे कृत्य करणारे चित्रित झाले असावे असा अंदाज आहे. सिसिटीव्ही फुटेज चेक करून हे कृत्य करणाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी नगरसेवकांनी केली आहे.

## रामनगर पोलिसांनी कुख्यात आरोपीकडून चोरीच्या ५ मोटार सायकल केल्या जप्त



**अक्षराज : वसंत वडस्कर**
**दि.०८, चंद्रपूर :** रामनगर पोलीस स्टेशनच्या पथकाने कुख्यात मोटार सायकल चोरट्यांच्या टोळीवर धडक कारवाई करत एकूण ५ चोरीच्या मोटार सायकली जप्त केल्या आहेत. ही कारवाई रामनगर पोलीस पथकाने तांत्रिकदृष्ट्या, कौशल्यपूर्ण तपास करुन यशस्वी पार पाडली.

प्राप्त माहितीनुसार, फिर्यादी चंद्रहास अर्जून मुन ( रा. शामनगर, चंद्रपूर) यांची हिरो होंडा सीडी, डिलक्स एमएच ३४ डब्ल्यू ६७२४) मोटारसायकल बंगाली कॅम्प परिसरातून चोरीला गेल्याची तक्रार रामनगर पोलीस स्टेशनमध्ये दाखल झाली होती. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस पथकाने परिसरातील सीसीटीव्ही फ ुटेज तपासून आणि गोपनीय सूत्रांच्या मदतीने संशयित आरोपींचा शोध घेतला. तपासादरम्यान, पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार दोन आरोपी गोपाल जीवन मालाकार (३०), रा. शामनगर, बंगाली कॅम्प, चंद्रपूर व आशिष उर्फ जल्लाद अक्रम शेख (२२), रा. फुकटनगर, एकता नगर, चंद्रपूर यांना ताब्यात घेण्यात आले.

दोघांची चौकशी केल्यावर त्यांनी चंद्रपूर व नागपूर जिल्ह्यातील विविध ठिकाणाहून मोटारसायकली चोरी केल्याची कबुली दिली. त्यांच्या ताब्यातून ५ चोरीच्या मोटारसायकली एकूण अंदाजे १,६०,००० किंमतीच्या जप्त करण्यात आल्या. जप्त वाहने हिरो होंडा सी. डी. डिलक्स (एमएच ३४ डब्ल्यू ६७२४), होंडा अ‍ॅक्टीव्हा ६ जी (बिना नंबर सुझुकी १२५ (एमएच ४९ ए.वाय. ८५९२), हिरो स्प्लेंडर प्लस (एमएच ४९ सी. एन. २३२०), हिरो स्प्लेंडर प्लस (एमएच ३४ बी. एल. ६२४२) असे आहेत.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो. नि. देवाजी नरोटे, हनुमान उगले, निलेश वाघमारे, तसेच आनंद खरात, जितेंद्र आकरे, शरद कुडे, लालु यादव, बाबा नैताम, गजानन नागरे, मनिषा मोरे, आक्षि इतर कर्मचाऱ्यांचा सहभाग होता.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे श्रीकृष्ण नसून जनतेचे भूखंड लाटणारे बकासुर आहेत
### आशिष शेलार यांच्या वक्तव्याचा; प्रशांत कांबळे यांच्या कडून तीव्र निषेध

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.०८, पुणे :** कोरेगाव पार्क परिसरातील तब्बल ४४ एकर महार वतनाची जमीन केवळ ₹५०० च्या स्टॅम्प पेपरवर मोफत गिळंकृत करण्याचा प्रयत्न महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्या कंपनीने केल्याचे समोर आले आहे. या व्यवहाराची मूळ किंमत सुमारे ₹१८०० कोटी असून, ती कृत्रिमरीत्या फक्त ₹३०० कोटींवर आणण्यात आली. एवढेच नव्हे तर या व्यवहारावर स्टॅम्प ड्युटीही माफ करण्यात आली, ही बाब गंभीर स्वरूपाची आहे.

जरी सध्या हा व्यवहार रद्द करण्यात आला असला, तरी ज्या कंपनीमार्फत हा व्यवहार झाला, त्या संबंधित दोषींवर कारवाई सुरू आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर देखील जबाबदारी निश्चित करण्याची वेळ आली आहे. परंतु, या संपूर्ण प्रक्रियेत हा दबाव टाकणारा ‘बकासुर’ कोण?’’ हा प्रश्न जनतेसमोर अद्यापही अनुत्तरित आहे.

दरम्यान, या विषयावर भाजप नेते आशिष शेलार यांनी दिलेल्या वक्तव्यात म्हटले आहे की, पार्थ सारख्या एका कोवळ्या मुलाला तुम च्या राजकारणाची शिकार बनवू नका; पार्थ निर्दोष आहे.

यावर आम आदमी पार्टी पुणे शहराध्यक्ष प्रशांत कांबळे अनुसूचित जाती यांनी तीव्र निषेध नोंदवला आहे. त्यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे श्रीकृष्ण नसून भूखंड लाटणारे बकासुर आहेत.

श्रीकृष्ण यांनी नेहमीच अन्यायाविरुद्ध लढा दिला; पण या दोघांनी जनतेच्या जमिनी लाटून न्यायाला हरवण्याचा प्रयत्न केला आहे. सत्तेत आल्यानंतर भाजपा नेत्यांनी



सत्तेचा दुरुपयोग करून आपल्या म ुलाबाळांची घरे भरली आहेत.

ज्या कंपनीच्या मार्फत हा व्यवहार झाला, त्यातील १% भागीदारीवर कारवाई होते, पण ९९% भागीदारीवर कारवाई होत नाही हीच या सरकारची शोकांतिका आहे.

प्रशांत कांबळे यांनी पुढे सांगितले, हा प्रकार म्हणजे गरीब भावाला अडकवून श्रीमंत भावाला वाचवण्याचा कटकारस्थान आहे.

पार्थ पवार आणि त्यांचे वडील अजित पवार यांनी स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी भावाचा बळी दिला आहे.

**तसेच आम आदमी पार्टीची ठाम मागणी आहे.**

या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होईपर्यंत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप नेते आशिष शेलार यांनी आपल्या पदाचा तत्काळ राजीनामा द्यावा.

कारण त्यांच्या सत्तास्थानी राहिल्याने चौकशीवर दबाव तंत्राचा वापर होण्याची शक्यता आहे.

या तिघांच्या राजीनाम्यानंतरच खरी आणि निष्पक्ष चौकशी शक्य होईल. आम आदमी पार्टीने या प्रकरणात उच्चस्तरीय न्यायालयीन चौकशी व दोषींवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

## दळणवळणाच्या दृष्टीने रस्त्यांचे महत्त्व अनमोल : आ. काशिनाथ दाते
### २० लाख रुपयांचा पाडळी-कान्हुर रस्त्याचे भूमिपूजन

**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.०८, पारनेर (अहिल्यानगर) :** रस्ते फक्त प्रवासाचे साधन नसून गावांना, शहरांना आणि नागरिकांना जोडणाऱ्या जीवनवाहिन्या आहेत. चांगल्या रस्त्यांमुळे शेतकऱ्यांचा माल वेळेवर बाजारपेठेत पोहोचतो, ग्रामीण उद्योगांना गती मिळते, रोजगारनिर्मिती वाढते आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनात सुलभता येते. त्यामुळे दळणवळणाच्या दृष्टीने रस्त्यांचे महत्त्व अनमोल असल्याचे मत आमदार काशिनाथ दाते यांनी व्यक्त केले.

पारनेर तालुक्यातील पाडळी तर्फे कान्हुर येथे भाळवणी ते काळकुप ते पाडळी गोरेगाव या रस्त्याच्या मजबुतीकरण व डांबरीकरणाचे भूमि पूजन शुक्रवार, दि.७ नोव्हेंबर २०२५ रोजी आमदार काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते पार पडले. या कामासाठी शासनाकडून २० लाख रुपयांचा निधी प्रशासकीय मंजुरीसाठी उपलब्ध झाला आहे. याप्रसंगी आमदार दाते बोलत होते.



पुढे बोलताना आमदार दाते म्हणाले,आज संपूर्ण मतदारसंघात म हायुती सरकारच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली गावोगावी रस्त्यांचे जाळे मजबूत करण्याचे काम सुरू आहे. हे रस्ते आपल्या विकासाचा पाया आहेत. जसे रक्तवाहिन्यांशिवाय शरीर कार्य करू शकत नाही, तसे रस्त्यांशिवाय देशाचा विकास शक्य नाही.

मतदारसंघातील प्रत्येक गावात पक्के आणि दर्जेदार रस्ते तयार करणे माझे प्राधान्य आहे. यामुळे शिक्षण, आरोग्य, व्यापार आणि रोजगार यांसारख्या क्षेत्रांमध्ये सर्वसामान्य नागरिकांना प्रगतीच्या संधी मिळतील. आज पाडळी तर्फे कान्हुर येथे तयार होणारा रस्ता सक्षम समाज आणि प्रगत राष्ट्राकडे नेणारा मार्ग ठरेल.

यावेळी जिल्हा सरचिटणीस सुभाष दुधाडे, राष्ट्रवादी जिल्हा उपाध्यक्ष हरीष दावभट, सर्जेराव दावभट,राजू दावभट, प्रथमेश सुंबे, अंकुश सुंबे, डॉ. मिनल सुंबे,अमन दावभट,राहुल काळे, संदिप वलघुडे, डॉ. विष्णु काळे,अक्षय सिरसाठ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## सामान शिफ्ट करणारेच निघाले चोर

**दि.०८, रायगड :** तुम्हीही घरातील साम ान शिफ्ट करत असताना ते काम इतर कोणाच्या हातू करुन घेणार असाल तर सावधानता बाळगा. कारण, घरातलं सामान शिफ्ट करताना तुमच्याकडील मौल्यवान दागिने, वस्तू, पैसे यांच्यावर भामट्यांची नजर असते. त्यामुळे तुम्हाला याचा फटका मोठा बसू शकतो. असाच काहीसा प्रकार आता पनवेलमध्ये घडला आहे. घरातील सामान शिफ्ट करण्याचा बहाणा करत लाखो रुपये मूल्याचे दागिने चोरी करणार्या दोन व्यक्तींना पनवेल शहरातील पोलिसांनी अवघ्या काही दिवसांच्या आत मुंबईच्या ठिकाणाहून पकडले आहे. या गृहित परतंदर पोलिसांनी यावेळी तब्बल ९० टक्के चोरीच्या सामानाला परत आणत त्यावर उत्तम नियंत्रण ठेवले आहे, ज्यामुळे स्थानिक नागरिकांकडून पोलिसांच्या कार्यक्षमतेचे मनःपूर्वक कौतुक केले जात आहे. घटनेनंतर सुदर्शन शिंगाडे यांनी तत्काळ पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक फडतरे, हवालदार अमोल पाटील, पोलीस शिपाई विशाल दुधे आणि पोलीस नाईक सुभाष राठोड यांच्या पथकाने तपास सुरू केला. गुप्त माहितीच्या आधारे पथकाने मुंबईत सापळा रचत दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले.




## 'डिजिटल अरेस्ट'

पूर्वी दरोडेखोर घरांवर दरोडा टाकून घरातील मौल्यवान वस्तू आणि रोख रक्कम लुबाडून नेत असत पण आज काळ बदलला आजचे युग हे डिजिटल युग आहे आणि या डिजिटल युगात दरोड्याची पद्धतही बदलली. दरोडेखोरही डिजिटल झाले आणि दरोड्याची पद्धत डिजिटल झाली. आज दरोडेखोर तंत्रज्ञानाचा वापर करून लोकांची लुबाडणूक करतात त्यालाच सायबर गुन्हा असे म्हणतात. सायबर गुन्हेगार नागरिकांना तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना लुबाडण्याचा नवा नवा फंडा शोधत असतात कधी ते क्रेडिट कार्डची माहिती विचारून तर कधी बँक खात्याची माहिती विचारून अवघ्या काही सेकंदात नागरिकांचा बँक बॅलन्स शून्य करतात. जेंव्हा खात्यातून पैसे गायब होतात तेंव्हाच नागरिकांना आपली लुबाडणूक झाली हे लक्षात येते मात्र तोवर खूप उशीर झालेला असतो. सायबर गुन्हेगार फसवणूक झालेल्या नागरिकांचा बँक बॅलन्स शून्य करतात बरे हे सायबर गुन्हेगार शोधणे हे पोलिसांसाठीही मोठे जिकिरीचे काम असते कारण हे गुन्हेगार अदृश्य चेहऱ्याचे असतात. हे सायबर गुन्ह्याचे नवेनवे फंडे शोधून काढत असतात असाच ' डिजिटल अरेस्ट' हा नवा फंडा सायबर गुन्हेगारांनी शोधून काढला आहे. सध्या डिजिटल अरेस्टच्या नावे फसवणूक आणि लुटीचा सुळसुळाट सुरू आहे. डिजिटल अरेस्टद्वारे फसवणूक झाल्याचा प्रकार सध्या रोजच घडत आहे. यात सायबर गुन्हेगार जेष्ठ नागरिकांना लक्ष करतात आणि त्यांना डिजिटल अरेस्टची भीती घालून त्यांच्याकडून लाखोंची, करोडोंची लूट करतात. असाच प्रकार काही दिवसांपूर्वी पुण्यात घडला. डिजिटल अरेस्टची भीती दाखवून सायबर गुन्हेगारांनी ८३ वयाच्या निवृत्त सरकारी अधिकाऱ्याला तब्बल १ कोटी २० लाखांना गंडा घातला. याचा प्रचंड मानसिक त्रास झाल्याने त्या व्यक्तीचा मृत्यू झाला. याआधी हरियाणातही एका वृद्ध दांपत्याला अशाच प्रकारे डिजिटल अरेस्टची भीती दाखवून एक कोटी रुपयांना लुबाडले. डिजिटल अरेस्ट करताना सायबर गुन्हेगार श्रीमंत असणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना लक्ष करतात. सायबर गुन्हेगार जेष्ठ नागरिकांना व्हिडिओ कॉल करून आपण पोलिस, ईडी, सिआयडी, सीबीआय, प्राप्तिकर विभाग, लष्करी अधिकारी असल्याची बतावणी करतात. देशविघातक कृत्य, बेकायदेशीर वस्तू, ड्रग्स, बनावट पासपोर्ट, दहशतवाद्यांशी संबंध असल्याचे सांगून जेष्ठ नागरिकांना डिजिटल अरेस्ट केल्याचे संगीतात. पीडितांना विश्वास बसावा यासाठी ते न्यायालयाचे बनावट आदेशही पाठवतात. सायबर गुन्हेगार पीडित व्यक्तीला २४ तास त्यांच्या घरातच व्हिडिओ कॉलवर बंदिस्त अर्थात नजर कैदेत ठेवतात. सायबर गुन्हेगार व्हिडिओ कॉलवर कुठल्या तरी पोलिस स्टेशन किंवा सीबीआयच्या कार्यालयातून बोलत असल्याचे भासवतात. त्यामुळे पीडित व्यक्तीला त्यांच्यावर विश्वास बसतो. पीडित व्यक्ती आपण खरेच डिजिटल अरेस्ट झाल्याचे मानतो आणि तुरुंगात जावे लागू नये म्हणून सायबर गुन्हेगार मागतील तेवढी खंडणी त्याला देण्यास तयार होतात. सायबर गुन्हेगार ही खंडणी ऑनलाईन वसूल करतात. अवघ्या काही तासात सायबर गुन्हेगार या जेष्ठ नागरिकांकडून लाखो करोडो रुपये लुबाडतात. सायबर गुन्हेगारांनी डिजिटल अरेस्ट हा नवा फंडा वापरून यावर्षी जानेवारी ते ऑगस्ट या आठ महिन्यात तब्बल ११२ कोटी रुपये लुबाडल्याचे समोर आले आहे. या आठ महिन्यात डिजिटल अरेस्टचे तब्बल २०८ गुन्हे नोंदवले गेले आहेत. या आकडेवारी वरुनच याची व्याप्ती किती मोठी आहे हे आपल्या लक्षात येईल. डिजिटल अरेस्टचे गुन्हेगार शोधणे सायबर पोलिसांसाठी मोठी डोकेदुखी बनली आहे कारण हे सर्व गुन्हेगार अदृश्य चेहऱ्याचे असतात आणोबते गुन्हा देखील आभासी पद्धतीने करतात. सायबर गुन्हेगार देशातील कोणत्याही भागातून किंवा अगदी परदेशातूनही हा गुन्हा करतात त्यामुळे त्यांना शोधणे पोलिसांना सहज शक्य होत नाही. सायबर पोलिस या गुन्हेगारांना शोधण्याचा सर्वो तोपरी प्रयत्न करत असतातच मात्र नागरिकांनीही याबाबत सतर्क राहायला हवे. भारतीय कायद्यात कोठेही डिजिटल अरेस्टला थारा नाही. आपल्या कायद्यानुसार डिजिटल अरेस्टला कोणतीही मान्यता नाही याची नोंद नागरिकांनी घ्यायला हवी. पोलिस किंवा कोणतीही सरकारी यंत्रणा आपल्याला डिजिटल अरेस्ट करू शकत नाही. मात्र हे खूप कमी लोकांना माहीत आहे म्हणूनच याबाबत जनजागृती व्हायला हवी. नागरिकांना विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना याबाबत माहिती द्यायला हवी. डिजिटल अरेस्ट किंवा एकूणच सायबर गुन्ह्याविषयी शाळा महाविद्यालयात कार्यशाळा, प्रत्यक्षिके, प्रशिक्षणे, जनजागृती कार्यक्रम आणि प्रचार प्रसार करायला हवा. प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि सोशल मिडियातूनही याबाबत जनजागृती व्हायला हवी. नागरिकांनीही याबाबत सतर्क राहायला हवे. नागरिक सतर्क राहिले तरच सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात अडकणार नाही.

# ।। भारतात ३ मोठी मेट्रो शहरे ।।



वाढती लोकसंख्या ही भारताच्या विकासातील मोठा अडथळा आहे. या वाढत्या लोकसंख्येला सोयी-सुविधा पुरविण्यासाठी शहरपातळीवर कोणकोणत्या योजना राबवायला हव्यात, याविषयीचे विश्लेषण करतानाच दुसऱ्या बाजूला वाढत्या लोकसंख्येमुळे शहराचे कसे बकालीकरण होत आहे, यावर टाकलेली ही एक नजर.. ११ जुलै या जागतिक लोकसंख्येवरून... शहरीकरण म्हणजे शहराच्या लोकसंख्येची व त्याच्या क्षेत्राची वाढ. वाढते औद्योगिकीकरण व खेड्य़ातून शहराकडे होणारे लोकांचे स्थलांतर यांचासुद्धा शहरीकरणामध्ये समावेश होतो. सन २०११च्या जनगणनेनुसार ३०.१६ टक्के लोकसंख्या शहरामध्ये राहते. एका पाहणीनुसार २०३० पर्यंत जवळपास २५ कोटी अतिरिक्त लोकसंख्या शहरांमध्ये येणार आहे. असेही दिसून आले आहे, की शहरीकरण आणि विकास हे बरोबरीनेच चालतात. जी राज्ये झपाट्य़ाने विकास करत आहेत त्यांचाच शहरीकरणाचा वेग अधिक आहे. सन २०१२-१३ सालच्या पाहणीनुसार महाराष्ट्राच्या शहरीकरणाची टक्केवारी ४५.२ टक्के होती. ती सन २०३०पर्यंत ५८ टक्के होण्याची शक्यता आहे. भारतातील ३ मोठ्य़ा मेट्रो शहरांची लोकसंख्या जगातील काही देश जसे कॅनडा, मलेशिया, सौदी अरेबिया, ऑस्ट्रेलिया यांच्यापेक्षा मोठी होईल. या सर्व वाढत्या लोकसंख्येचा आजच्या शहरांवर मोठ्य़ा प्रमाणात परिणाम होणार आहे. या सर्व परिणामांचा सूक्ष्मपणे विचार करणे अत्यंत आवश्यक आहे, कारण शहरीकरण आणि त्याचा वेग यांना थोपवणे आता जवळपास दुरापास्त आहे आणि देशाच्या विकासाच्या दृष्टीने शहरीकरण आवश्यकसुद्धा आहे.

शहरीकरण म्हणजे लोकसंख्येचे ग्रामीण भागातून शहरी भागात होणारे स्थलांतर , ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांच्या प्रमाणात होणारी घट आणि समाज या बदलाशी जुळवून घेण्याचे मार्ग. याचा अर्थ ग्रामीण भागाऐवजी शहरी भागातील लोकसंख्या वाढ असाही होऊ शकतो. ही मुख्यतः अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे शहरे आणि शहरे तयार होतात आणि अधिक लोक मध्यवर्ती भागात राहण्यास आणि काम करण्यास सुरवात करतात तेव्हा ते ठिकाण मोठे होतात. शहरीकरणाला चांगली बाजूही आहे. देशाचा आर्थिक विकास हा शहरीकरणावरही अवलंबून असतो. सन २०३०पर्यंत भारताचे ७० टक्के स्थूल राष्ट्रीय उत्पन्न शहरातून येणार आहे. कारण देशाच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत औद्योगिकीकरण व सेवा क्षेत्रात आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरही हेच चित्र दिसते. विकसित देशातील शहरीकरणाची टक्केवारी ही नेहमीच जास्त असते. अमेरिकेमध्ये शहरीकरणाचे प्रमाण ८० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. शहरीकरणामुळे शिक्षणाचा दर्जा सुधारतो. मोठ्य़ा प्रमाणावर रोजगार उपलब्ध होतो. त्याचबरोबर आजूबाजूच्या खेडय़ांचासुद्धा विकास होत असतो. परंतु विकासाबरोबरच शहरीकरणाची काळी बाजूसुद्धा ठळकपणे दिसून येते. शहरीकरणामुळे शहरातील सोयीसुविधांवर मोठय़ा प्रमाणावर ताण वाढतो व शहरी वातावरणाचा समतोल बिघडतो. काही शहरे वगळता सर्व शहरांमध्ये सध्याच्या लोकसंख्येला आवश्यक असलेला पाणी पुरवठा, मलनि:सारण व्यवस्था, वाहतूक व्यवस्था याची मोठ्य़ा प्रमाणावर कमतरता भासते. त्या पुरवतानाच स्थानिक संस्थांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळेच वाढीव लोकसंख्येमुळे त्या सोयीसुविधांवर आणखीनच प्रचंड ताण पडणार आहे. या सर्व सुविधांची गरज सन २०३०पर्यंत कितीतरी पटीने वाढणार आहे. शहरांना भेडसावणारी मुख्य समस्या म्हणजे पाणीपुरवठा, ज्याची मागणी २.५ पटीने होणार आहे. आजच शहरातील जमा झालेल्या घन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी योग्य जागा व व्यवस्था उपलब्ध नाही. सन २०३०पर्यंत घन कचऱ्यामध्ये ५ पट वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हा प्रश्न अधिकच बिकट होणार आहे. दुसरी समस्या म्हणजे रस्ते आणि वाहतूक. मोठ्य़ा शहरातील वाहतूक व्यवस्था घाईगर्दीच्या वेळेमध्ये नेहमीच कोलमडते. उदारीकरणामुळे सर्वसामान्यांची क्रयशक्ती मोठ्य़ा प्रमाणावर वाढली आहे. त्यामुळे खाजगी वाहनांची संख्या दिवसेंदिवस मोठय़ा प्रमाणावर वाढत आहे. आजच गर्दीच्या वेळी रस्त्यांवर वाहनांची रांगच रांग लागते. पुढे तर खाजगी वाहनांची संख्या जवळपास दुपटीने वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्येवर आतापासूनच विचार केला नाही तर भयानक परिस्थितीचा सामना करावा लागेल.

शहरातील बहुतांश लोकसंख्या ही लघू आणि मध्यम उत्पन्न गटातील असते. शहरातील गगनाला भिडणाऱ्या जमिनीच्या दराने तसेच बांधकामाच्या वाढीव खर्चामुळे त्यांना परवडणाऱ्या किमतींमध्ये घरं उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे त्यांना नाइलाजाने झोपडपट्टीचा आसरा घ्यावा लागतो. आज मुंबईतील ६० टक्के जनता झोपडपट्टीमध्ये राहते. झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांची आजची परिस्थिती पाहिली की कुणाही सुजाण नागरिकाची मान लाजेने खाली जाते. सन २०३०मध्ये परवडणाऱ्या घरांची मागणी ३.८ कोटींवर जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे झोपडपट्ट्य़ांमध्ये वाढ होतच राहणार आहे. शहरीकरणाचा परिणाम पर्यावरणावरही मोठ्य़ा प्रमाणावर होत असतो. शहरीकरणासाठी मोठय़ा प्रमाणावर वृक्षतोड होत असते. कितीही थांबवण्याचा प्रयत्न केला तरीही पर्यावरण संवेदनशील क्षेत्रामध्ये अनधिकृत बांधकाम होतच असते. त्यामुळेच पर्यावरणाचा समतोल बिघडतो. समुद्राची पातळी वाढत आहे, डोंगरांचा ऱ्हास होतोय. नुकत्याच झालेल्या उत्तरकाशीतील जलप्रलयालासुद्धा अनियंत्रित बांधकाम जबाबदार आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे. काँक्रीट, अस्फाल्ट, विटा यासारखे साहित्य उष्णता शोषून घेतात त्यामुळे शहरातील हवा रात्रीसुद्धा गरम असते. शहरातील वेगवेगळ्या घडामोडींमुळे वातावरणात वेगवेगळे विषारी द्रव्य उत्सर्जति केले जातात. जसे कार्बन डायऑक्साइड, सल्फर डायऑक्साइड यांचे प्रमाण खूप वाढत चालले आहे. त्यामुळेच शहरात श्वास घ्यायला शुद्ध हवा मिळत नाही. यात दुचाकी आणि चारचाकी यातून उत्सर्जति होणाऱ्या धुराचा मोठा वाटा आहे. वाढत्या विकासकामामुळे नैसर्गिक नाले, तलाव मोठय़ा प्रमाणावर बुजवले जात आहेत. त्यामुळे पर्यावरणावर आणि जैवविविधतेवर विपरीत परिणाम होत आहेत. शहरातील जमिनीतील भूजलाची पातळी घटली आहे. शहरीकरणामुळे सामाजिक व्यवस्थेवरसुद्धा परिणाम होतो. आता शहरातून एकत्र कुटुंब पद्धती जवळजवळ नाहीशाच झाल्या आहेत. सर्व जण आत्मकेंद्रित झाले आहेत. ते स्वतःच्या कोशात मग्न असून त्यांची सामाजिक बांधीलकी कमी होत चालली आहे. आता वृद्धाश्रमाची गरज वाढते आहे. सदनिका संस्कृतीमध्ये शेजारच्या घरात एखाद्यावर हल्ला होत असेल तरी कोणी धावून जात नाही. मोठे शहर हे आथक केंद्र बनल्यामुळे शहरात होणाऱ्या गुन्ह्य़ांमध्ये निरंतर वाढ होत आहे. तसेच आजच्या घडीला शहराला मोठा धोका दहशतवाद्यांकडून संभवतो. दहशतवाद्यांकडून आतापर्यंत जे हल्ले झाले ते मुंबई, दिल्ली यासारख्या मोठ्य़ा शहरातच झालेले आहेत. शहराच्या अवाढव्य पसाऱ्यात दहशतवाद्यांचा शिरकाव रोखणे अशक्य आहे. अगदी राजधानी दिल्ली, जिथे सुरक्षा व्यवस्था अत्यंत कडक आहे, तिथेसुद्धा दहशतवादी हल्ले होतच आहेत. वाढत्या शहरीकरणामुळे ही समस्यासुद्धा अधिकच जटिल होणार आहे. शहरातील मोकळी जागा वाढवणे अशक्य आहे. त्या उलट वाढत्या लोकसंखेच्या अतिक्रमणामुळे मोकळ्या जागा, मैदाने कमी होत आहेत. त्याचाच विपरीत परिणाम लहान मुलांच्या मन:स्वास्थ्यावर व वाढीवर होत आहे. वाढत्या लोकसंखेमुळे शाळा, महाविद्यालय, दवाखाने यांसारख्या सोयीसुविधांची आत्ताच वानवा भासत आहे. शहरात जागेची कमतरता असल्यामुळे वाढत्या लोकसंख्येचा समावेश करण्यासाठी गगनचुंबी इमारती उभ्या राहत आहे. त्यामुळे अग्नी सुरक्षा, वाहतूक समस्या, निर्माण होत आहेत. शहरीकरणामुळे राजकीय दृष्टिकोनावरसुद्धा परिणाम होण्याची शक्यता आहे. शहरात राहणाऱ्या मतदारांची संख्या खेडय़ातील मतदारांच्या संख्येपेक्षा जास्त झाल्यामुळे राजकारण्यांना शहर विकासावर जास्त भर द्यावा लगेल. वाढत्या शहरीकरणामुळे आणखी एका महत्त्वाच्या बाबीवर परिणाम झाला आहे, तो म्हणजे शारीरिक स्वास्थ्य. वातावरणातील ध्वनिप्रदूषण, दिवसभराची धावपळ, मोठय़ा प्रमाणावर मनावर होणारा ताण यामुळे शरीर आणि मन:स्वास्थ्यावर परिणाम होत आहे. श्वसन विकार, हृदयविकार अशा रोगांमध्ये वाढ दिसून येते. वेगवेगळ्या रोगांचा जसे डेंगू, मलेरिया यांचा प्रादुर्भाव मधून मधून होतच असतो. एकंदरीत यावरील सर्व समस्या आत्ताच निवारणे कठीण झाले आहे तर भविष्यात काय होईल?

शहरीकरणामुळे होणारे संभावित दुष्परिणाम कमी करण्यासाठी सर्वानीच आतापासून विचार करावयास पाहिजे व योग्य त्या उपाययोजना अमलात कशा आणता येतील, हे पाहिले पहिजे. त्यात प्रादेशिक समतोल, मध्यम व छोट्य़ा शहरांचा विकास, आर्थिकदृष्ट्या सक्षम नवीन शहरांचा विकास यावर अधिक भर दिला पाहिजे. शहरांबाहेरील खेड्य़ांचा योग्य प्रमाणात विकास केल्यास गावाकडून शहराकडे येणारा लोंढा कमी होण्यास मदत होईल. शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम आणि सोयीस्कर केली पहिजे. ज्यामुळे खाजगी गाड्य़ांमधून प्रवास करणारे, सार्वजनिक वाहतुकीचा वापर सुरू करतील व त्यामुळे रस्त्यावरील वाहनांची गर्दी कमी होऊन, परिणामी पर्यावरण प्रदूषण कमी होण्यास मदत होईल. नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून आपले शहर स्मार्ट शहर करणे काळाची गरज अहे. या तंत्रज्ञानाचा उपयोग सर्वच क्षेत्रांमध्ये जसे दळणवळण, मूलभूत सुविधा, वाहतूक व्यवस्था, शहर सुरक्षा व शहराचे व्यवस्थापन यामध्ये मोठय़ा प्रमाणावर होऊ शकतो. ज्यामुळे रहिवाशांचे जीवन सुखकर होईल. बांधकामे करताना ऊर्जा बचतीचं तंत्रज्ञान अमलात आणणे आवश्यक आहे, त्यासाठी लीड प्रमाणपत्रे बंधनकारक करणे आवश्यक आहे. ज्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास कमी होइल. समाजातील प्रत्येक घटकाने त्यातही शासन आणि स्थानिक स्वराज्य संस्थेने आपापली जवाबदारी ओळखून योग्य ती पावले टाकली तर शहरीकरणाचे दुष्परिणाम निशितपणे कमी होतील.

**!! विश्व शहरीकरण दिनानिमित्त**
**सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!**

**- संकलन व सुलेखन -**
**श्री.कृष्णकुमार निकोडे गुरूजी.**
**फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३**

## माहेर..

हिंडूलागे इतस्ततः
प्रशिक्षीत गुप्त हेर
वेळ आहे बरोब्बर
काढ लफडे बाहेर

मोतीजड नाकाला
करतोयं भलते थेर
पक्षातमहत्व वृध्दी
वाढू लागलायं घेर

रिंगणात कोंडायचे
समस्त बाजूने घेर
मनजरी कोल्ह्याचे
समजे स्वतांस शेर

डोई जड होऊ नये
आणावा सव्वा शेर
अडकवा केसमध्ये
आता ना करी देर

स्पर्धा करी गुलाबा
अंगणामध्ये कन्हेर
आज काल श्रेष्ठींचे
आदेशा करे अव्हेर

पक्ष निष्ठा शून्यवत
कायपदरात अखेर
महत्वसरले क्षणात
बाहेरपाठवला केर

साडीचोळी दे बाई
पुरवा घरचा आहेर
सासुरवास करतेयं
आपले जरी माहेर

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# इतर वेळेच्या फटाके बाजीवर देखील बंदी घाला !

फटाके आणि दिवाळी हे समीकरणच आहे. दरवर्षी दिवाळीत मोठ्या प्रमाणात फटाके वाजवले जातात त्यामुळे वायू प्रदूषण तर होतेच पण त्यासोबतच ध्वनी प्रदुषण देखील होते. फटाक्यांचे केवळ इतकेच दुष्परिणाम आहेत असे नाही तर याशिवायही अनेक दुष्परिणाम फटाक्यांमुळे होतात म्हणूनच दरवर्षी दिवाळी आली की शासकीय यंत्रणा, सामाजिक व सेवाभावी संस्था तसेच पर्यावरणवादी संघटना नागरिकांना दिवाळीत जास्त फटाके वाजवू नका असे आव्हान करतात.

फटाकेमुक्त दिवाळी साजरी व्हावी यासाठी शासकीय पातळीवर विविध उपक्रम राबवले जातात. शाळा, कॉलेजमधून त्याबाबत जनजागृती केली जाते. फटाक्यांचे दुष्परिणाम समजावून सांगितले जातात आणि ते योग्यही आहे, त्याची गरजही आहे. फटाकेमुक्त दिवाळी साजरी करणे ही काळाचीच गरज आहे. फटाक्यांमुळे अनेक दुष्परिणाम होतात. सरकारी यंत्रणा, सामाजिक व सेवाभावी संस्था तसेच पर्यावरणवादी संघटनांच्या आव्हानांना आणि प्रयत्नांना बऱ्यापैकी यशही मिळत आहे. यावर्षी दिवाळीत फटाके वाजले मात्र मागील वर्षीच्या तुलनेत त्याचे प्रमाण कमी होते. फटक्यांबाबत नागरिकांची जनजागृती होतेय ही अतिशय चांगली गोष्ट आहे. फटाक्यांच्या दुष्परिणामाबाबत नागरिक जागरूक होत आहे ही स्वागतार्ह बाब आहे याबाबत सरकारी यंत्रणा, सामाजिक व सेवाभावी संस्था तसेच पर्यावरणवादी संघटनांचे अभिनंदनच करायला हवे तसेच नागरिकांचेही आभार मानावे लागेल. नागरिकांनी दिवाळीत फटक्यांबाबात जी जागरूकता दाखवली ती इतर वेळेसही दाखवायला हवी. कारण आपल्या देशात केवळ दिवाळीतच फटाके वाजवले जातात असे नाही तर वर्षभर कोणत्या ना कोणत्या कारणांनी फटाके वाजवले जातात मग तो सण, उत्सव असो की आनंदाचा प्रसंग. फटाके वाजवूनच सण - उत्सव, आनंदाचे क्षण साजरे करण्याची प्रथाच पडली आहे. काही लोक नवीन वर्षाचे स्वागत फटाक्यांच्या आतषबाजीने करतात. ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री कानठळ्या बसतील इतकी फटाके वाजवली जातात. थर्टी फर्स्ट साजरा करताना उन्माद दाखवण्याच्या




खटाटोपात नागरिक फटकेबाजी करतात. नाताळच्या रात्रीही फटाके वाजवले जातात. ईदच्या दिवशी चांद दिसला की फटाके वाजवले जातात. वाढदिवस साजरा करताना फटाके वाजवण्याचे फॅड हल्ली सुरू झाले आहे. लग्नातही फटाक्यांची आतषबाजी पाहायला मिळते. दिवाळीत फटाके वाजवू नका असे आव्हान करणाऱ्या राजकीय नेत्यांच्या राजकीय मेळाव्यात, विजयी मिरवणुकांतही फटाक्यांची मोठ्या प्रमाणात आतषबाजी होते. दिवाळीत जास्त फटाके वाजू नयेत यासाठी प्रयत्न करणारे या इतर वेळी केल्या जाणाऱ्या फटाकेबाजीकडे मात्र सोईस्करपणे दुर्लक्ष करतात. दिवाळीच्या पाच दिवसांच्या फटाक्यांमुळे जे दुष्परिणाम होतात तेच इतर वेळेच्या फटाकेबाजीतही होतात. त्यामुळे या इतर वेळेच्या फटाक्यांच्या आतषबाजीवर देखील बंधने घातली पाहिजेत. नागरिकांनीही फटाके वाजवूनच आनंद साजरा केला पाहिजे ही मानसिकता बदलायला हवी. नागरिकांनी फटक्यांबाबत जी जागरूकता दिवाळीत दाखवली ती वर्षभर दाखवायला हवी.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# शिक्षण उपसंचालक यांच्या कार्यालयासमोर करणार ठिय्या आंदोलन

## विमाशि संघाचे प्रलंबित समस्यांबाबत आंदोलन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०८, चंद्रपूर :** विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर ह्या नागपूर येथे रुजू झाल्यापासून नागपूर विभागातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या शेकडो समस्या प्रलंबित असल्याने शिक्षकांमध्ये तीव्र असंतोषाची भावना असल्याने विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने सरकार्यवाह तथा आ. सुधाकर अडबाले यांच्या नेतृत्वात सोमवार, दिनांक १० नोव्हेंबर २०२५ रोजी विभागीय शिक्षण उपसंचालक, नादरूर यांच्या कार्यालयासमोर दुपारी ३ वाजेपासून समस्या सुटेपर्यंत ठिय्या आंदोलन करण्यात येणार आहे.

आमदार सुधाकर अडबाले यांनी विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर यांच्यासोबत दि.०७ ऑक्टोबर २०२५ रोजी जि.प.सभागृह, नागपूर येथे पार पडलेल्या समस्या निवारण सभेत दिलेल्या आश्वासनानुसार नागपूर विभागातील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात आलेली नाही. सभेचे इतिवृत्त अद्याप दिलेले नाही.

नागपूर विभागातील जवळपास मार्च महिन्यापासून पवित्र पोर्टलच्या माध्यमातून रुजू झालेल्या, अनुकंपा तत्वावरील नियुक्ती झालेल्या, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या व अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त शाळा, महाविद्यालयांमध्ये नियुक्त शिक्षक- कर्मचाऱ्यांची शालार्थ आयडी प्रकरणे प्रलंबित आहेत. पोस्ट अटॅच-डिटॅच ची कार्यवाही सुध्दा प्रलंबित आहेत. शिक्षणाधिकारी माध्यमिक जि. प. भंडारा व अधिक्षक, वेतन पथक व भविष्य निर्वाह निधी (माध्य.) भंडारा यांच्या नियमबाह्य व अनियमितता प्रकरणांबाबत केलेल्या तक्रारीनुसार चौकशी समिती नेमण्यात आली. मात्र, अजूनही चौकशी समितीने चौकशी केलेली नाही.

आमदार सुधाकर अडबाले यांनी नागपूर विभागातील कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या समस्यांबाबत समस्या निवारण सभा आयोजित करण्याबाबत पत्र दिले होते. मात्र, लोकप्रतिनिधीनी दिलेल्या पत्रावर कोणतीही दखल विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर यांनी घेतलेली नाही व सभा आयोजित केलेली नाही. या मागण्यांना घेऊन विमशि संघाच्या वतीने सोमवार, दि. १० नोव्हेंबर २०२५ रोजी विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर यांच्या कार्यालयासमोर दुपारी ३ वाजेपासून समस्या सुटेपर्यंत ठिय्या आंदोलन करण्यात येईल. या ठिय्या आंदोलनात मोठ्या संख्येने नागपूर विभागातील पदाधिकारी, सदस्य व समस्याग्रस्त शिक्षक - कर्मचारी यांनी सहभागी होण्याचे आवाहन विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष सुनील शेरकी, कार्यवाह दीपक धोपटे, महानगर कार्यवाह सुरेंद्र अडबाले आदींनी केले आहे.

# पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांचा पालम शहरात नागरी सत्कार संपन्न



**अक्षराज : बाळासाहेब फुलपगार**

**दि.०७, पालम (परभणी) :** पालम तहसील कार्यालयासमोर राज्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांचा भाजपचे ज्येष्ठ नेते गणेशराव रोकडे यांच्या वतीने हा भव्य नागरी सत्कार आयोजित करण्यात आला होता.

यावेळी मुख्य चौकात जेसीबी तुन फुलांची उधळण करत, सभा स्थळापर्यंत मिरवणूक काढण्यात आली. यावेळी नागरी सत्कारा सोबतच जनसंवाद मेळावा संपन्न झाला.

या कार्यक्रमाला भाजपाचे ज्येष्ठ नेते सुरेशराव वरपुडकर, डॉ.खटिंग, संतोषराव मुरकुटे, सुभाष कदम, भरत घनदाट, विठ्ठलराव रबदाडे, प्रेरणा वरपुडकर, लक्ष्मणराव रोकडे, लिंबाजी टोले, माऊली जाधव, भाजपा जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे, यांच्या सहपरभणी जिल्ह्यातील भाजपचे सर्व प्रमुख नेते, पदाधिकारी तसेच पालम शहरासह तालुक्यातील भाजपचे सर्व नेते व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी पोलीस निरीक्षक शेषराव खटाने यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

### भारतीय जनता पार्टी संपर्क कार्यालयाचे उद्घाटन

नागरी सत्कार समारंभ संपन्न झाल्यानंतर पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्या हस्ते भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी बालासाहेब रोकडे, गजानन रोकडे, तालुका अध्यक्ष मल्लिकार्जुन लांडगे, येशोदीप रोकडे, पांडुरंग रोकडे, मधुकर रोकडे, वामनराव बर्डे, माधन शिंदे राजन भाळे, दत्ता घोरपडे, मंगेश घोरपडे, माऊली घोरपडे, युवराज पवार, भारत हिलाल, राम गावंडे, राज गोडसे व भाजपा पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

### बसस्थानक उभारण्यासाठी पालकमंत्र्यांना दिले निवेदन

या कार्यक्रमात सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणाऱ्या आपले पालम या व्हाट्सअप ग्रुपच्या वतीने परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांना बस स्थानक उभारण्यासाठी निवेदन दिले. पालम हे महत्त्वाचे तालुक्याचे ठिकाण असुनही येथे आजपर्यंत बसस्थानक नसल्याने दररोज हजारो प्रवाशांची विशेषतः महिला, लहान मुले व वृद्धांचे हाल होत असल्याचे निदर्शनास आणून दिले व लवकरात लवकर बसस्थानक उभारण्यात यावे अशा आशयाचे निवेदन देण्यात आले. यावेळी आपले पालम व्हाट्सअप ग्रुप चे विलास चव्हाण यांच्या सह सदस्य उपस्थित होते.

# नवी मुंबईतील शाळांमध्ये 'विद्यार्थी दिन' व 'वंदे मातरम' गीताचा वर्धापन दिन साजरा

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०७, नवी मुंबई :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाळा प्रवेशाचे स्मरण करीत ०७ नोव्हेंबर रोजी राज्यभरात विद्यार्थी दिन साजरा करण्यात येतो. या माध्यमातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरक व्यक्तिमत्वापासून प्रेरणा घेऊन शिक्षणाचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवत अत्यंत उत्साहाने विद्यार्थी दिवस साजरा केला जातो. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातही विद्यार्थी दिवस नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या व खाजगी सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमधून साजरा करण्यात आला. याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील काही प्रभावी प्रसंगांविषयी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना माहिती करून दिली याप्रसंगी भारतरत्न बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावरील जीवनपटही प्रोजेक्टरच्या माध्यमातून शाळांमध्ये दाखविण्यात आला तसेच त्यांच्या कार्याची माहिती व महती सांगण्यात आली.प्रत्येक विद्यार्थी हा देशाचे भविष्य आहे याकरिता विद्यार्थ्यांनी शालेय जीवनामध्ये सतत ज्ञान प्राप्त करीत रहावे व त्या ज्ञानाचा उपयोग स्वतःची व देशाची प्रगती करण्यासाठी करावा याबाबत शिक्षकांच्या माध्यमातून व तज्ञ मार्गदर्शकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्यात आले. काही शाळांमध्ये व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते, तसेच पुस्तक प्रदर्शन मांडण्यात आले होते. काही शाळांमध्ये काव्यवाचन स्पर्धा तसेच वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. शासन परिपत्रकानुसार नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील शाळांमध्ये विद्यार्थी दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.त्याचप्रमाणे बकीम चंद्र चटोपाध्याय यांनी १८७५ साली लिहिलेल्या वंदे मातरम या गीताला १५० वर्ष पूर्ण झाली असून केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार वंदे मातरम गीत सामूहिक रितीने गाण्याचा उपक्रमही नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील



सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये तसेच कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये राबविला गेला. यात अनेक ठिकाणी शिक्षक, विद्यार्थ्यांसह पालकही सहभागी झाले. काही ठिकाणी देशाभिमान प्रदर्शित करीत नागरिकांनीही यामध्ये मोठ्या संख्येने सहभाग घेतला.या अनुषंगाने प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये देशाभिमान जागृत व्हावा तसेच त्यांना देशभक्तीची जाणीव व्हावी याकरिता शाळा-महाविद्यालय स्तरावर देशभक्तीपर भाषणे तसेच स्वातंत्र्य मिळवण्यासाठी ज्या शूरवीरांनी बलिदान दिले त्यांच्याबद्दल प्रदर्शन आणि भाषण अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या राष्ट्रीय गीत गायनाने देशाबद्दल असलेल्या अभिमानाची जाणीव विद्यार्थ्यांना झाली. काही शाळांमध्ये स्वातंत्र्य लढ्यातील बलिदान देणाऱ्या शूरवीरांविषयी माहितीप्रद प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली होती. यामुळे विद्यार्थ्यांना इतिहासातील घटनांची माहिती देत व वंदे मातरम गीताचे समूहगान करीत नवी मुंबईतील शाळांमध्ये वंदे मातरम सामूहिक गीत गायन हा उपक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

# महाराष्ट्र विद्यालयात सखी सावित्री समितीचा कार्यक्रम संपन्न

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०८, नागपूर :** महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय खापरखेडा येथे दिनांक ६ नोव्हेंबर २०२५ ला सखी सावित्रीचा कार्यक्रम घेण्यात आला. प्रथम महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांना माल्यार्पण करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सखी सावित्री समितीचे सचिव शाळेचे मुख्याध्यापक अरुण वडस्कर होते.तर प्रमुख अतिथी म्हणून चिचोली (खापरखेडा) ग्रामपंचायत सरपंच मीनाक्षी तागडे, गुमथी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या औषध निर्माण अधिकारी फातीमा शेख, आरोग्य सहायिका भारती नागदेवे, आरोग्य सेविका तारा नायडू, प्रा.आ. केंद्र चिचोली स्वास्थ अधिकारी खोब्रागडे, जिल्हा कुष्ठरोग समन्वय अतुल पारधी, सावनेर तालुका कुष्ठरोग निर्मूलन अधिकारी कीर्ती महाजन, अंगणवाडी सेविका लीला काकडे, पालक प्रतिनिधी दर्शना बागडे, शाळेचे उपमुख्याध्यापक लिखार सर, पुल्लीवार सर, श्रीमती नांदेकर मॅडम आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

सखी सावित्री समिती या कार्यक्रमात फातिमा शेख यांनी मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी लैंगिक समतेसाठी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच भारती नागदेवे यांनी मुलींचे आरोग्यासाठी योग, ध्यान आणि प्राणायाम याबद्दलची माहिती सांगितली. मीनाक्षी तागडे गुड टच आणि बॅट टच याबद्दल माहिती सांगितली.



कार्यक्रमात दामिनी पथकातील खापरखेडा पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक प्रतिभा डाखोरे व अश्विनी नौकरकर यांनी मुलींना आपली सुरक्षितता कशी राखावी? मोबाईल आपल्यापासून कसा दूर ठेवावा? याबद्दलचे अनमोल असे मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक वडस्कर यांनी आपल्या शाळेत मुलींच्या आरोग्यासाठी व सुरक्षिततेसाठी कोणकोणते उपक्रम राबवले जातात याबद्दलची सविस्तर माहिती सांगितली. याप्रसंगी या परिसरातील बहुसंख्य महिला वर्ग उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वनिता रेवतकर तर आभार प्रदर्शन निर्मला गिर्हे यांनी केले.

# थोडक्यात

## महादुला येथील श्रीवास नगरात कार्तिक पौर्णिमा उत्साहात साजरी



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०८, नागपूर :** मागील ३५ वर्षापासून महादूला परिसरातील श्रीवास नगरात हनुमान मंदिर पंच कमिटीच्या वतीने मोठ्या उत्साहात कार्तिक पौर्णिमा उत्सव भक्ती बाबांनी साजरा केला जातो. यावर्षी सुद्धा जागृती, हरिपाठ, पालखी, गोपाळकाला आणि भव्य महाप्रसादाचे वितरण करून हा उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी सुमारे २५०० लोकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.कार्यक्रमांमध्ये महादूला नगरपंचायतचे माजी नगराध्यक्ष राजेश रंगारी, माजी नगरसेवक राजेश मछले, पवन पखिड्डे, महेश धुळस, मनोज सावजी, नलिनी धुळस, सारिका झोड, नरेंद्र झोड, अजय वाणी, शरद वांढे, संतोष गुप्ता, अंकित तुरक आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. गावातील वातावरण धार्मिक राहावे याकरिता दरवर्षी काकड आरती येथील मंडळी करीत असतात. त्या अनुषंगाने येथे साजरा करण्यात आलेला कार्तिक पौर्णिमा उत्सव भक्तांसाठी नेहमीच फार महत्त्वाचा असतो. या उत्सवाच्या अनुषंगाने संपूर्ण श्रीवास नगरातील रस्ते रांगोळ्यांनी सजलेले होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हनुमान मंदिर पंच कमिटीचे पदाधिकारी जयपाल बिरखेडे, शंकरजी शेंडे, अमरजीत गोडबोले, मुन्नाजी मेश्राम, घनश्याम मेश्राम, पुरणजी आगासे, काशीरामजी आगासे, माधव लाडे, राहुल मानकर, विनोद आगासे, महावीर चन्नोरे, लता खोब्रागडे, ब्रिजलाल खोब्रागडे, दिलीप मेश्राम, सुनील खोब्रागडे, योगेश मेश्राम, स्नेहल मेश्राम, अजय मानकर, राजेश बोरकर आदींनी अधिक परिश्रम घेतले.

## मुदखेड नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी निवडणूक यंत्रणा सज्ज; निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची माहिती




**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०८, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक २०२५ दि.०२ डिसेंबर रोजी होणार असून मागील ३ वर्षांपासून खंडित असलेली नगरपरिषदेची निवडणूक काही दिवसांवर येऊन ठेपली असून महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने अलीकडच्या काळात महाराष्ट्र राज्यांतील रखडलेल्या नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुका दि.२ डिसेंबर रोजी घेणार असून यासंबंधी दिनांक ०६ नोव्हेंबर रोजी नगरपरिषदेच्या सभागृहात निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार आनंद देऊळगांवकर यांनी स्थानिक पत्रकारांशी पत्रकार परिषदेच्या माध्यमांतून निवडणूक विभागाने पूर्णपणे तयारी केली असून निवडणूक घेण्यासाठी सज्ज असल्याची माहिती देत नगरपरिषदेची निवडणूक पारदर्शकपणे आणि निष्पक्षपणे पार पाडली जाईल आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नगरपरिषदेचे मुख्याधिकारी जगदीश दळवी आणि नायब तहसीलदार मारोतराव जगताप निवडणूक प्रक्रियेत सहाय्यक म्हणून आपली भूमिका बजावतील.

सविस्तर वृत्त असे की, नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक २०२५ संबंधी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सांगितले की, शहरांत एकूण १० प्रभागाची रचना करत एकूण मतदार २१,५४९ असून त्यात १०,७२७ पुरुष असून स्त्री मतदारांची संख्या ११,०१९ अशी असून निवडणूक आयोगाने निश्चीत केलेल्या https://mahasecelec.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने नामनिर्देशन पत्र भरणा करणे व भरणा केलेले नामनिर्देशनपत्राची छायांकीत प्रत स्वाक्षरी निशी निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे दि. १० नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर या कालवधीत सुटीचे दिवस वगळून दुपारी ३:०० वा.पर्यंत सादर करावयाची असल्या बाबतची माहिती दिली. नामनिर्देशनपत्राची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची माहिती प्रसिध्द करण्याचा दिनांक १८ नोव्हेंबर, नामनिर्देशनपत्र मागे घेण्याचा अंतिम दिनांक अपिल नसेल तेथे १९ नोव्हेंबर ते दि.२१ नोव्हेंबर दुपारी ३:०० वा. पर्यंत., निवडणूक चिन्ह नेमूण देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक २६ नोव्हेंबर मतदानाचा दिनांक ०२ डिसेंबर २०२५ सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० वा पर्यंत. मतमोजणी व निकाल जाहिर करण्याचा दिनांक ०३ डिसेंबर २०२५ रोजी आहे निवडणूक आयोगाने दिलेली माहिती निवडणूक निर्णय अधिकारी आनंद देऊळगावकर यांनी सांगितली. निवडणुकीची घोषणा होताच आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली असून त्याचा सर्वांनी काटेकोरपणे पालन करत निवडणूक प्रक्रिया ही शांततेत व सुरळीतपणे पार पडणेसाठी सर्वांनी सहकार्य करावेत असे आह्वान निर्णय अधिकारी तथा तहसीलदार आनंद देऊळगावकर यांनी यावेळी दिले.

## अहिल्यानगर दक्षिण राष्ट्रवादीच्या जिल्हाध्यक्षपदी कळमकर



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, अहिल्यानगर :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार गट) प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी अहिल्यानगर (दक्षिण) जिल्हाध्यक्ष म्हणून माजी आ.दादाभाऊ कळमकर यांची नुकतीच नियुक्ती केली आहे. प्रदेशाध्यक्ष शिंदे यांनी त्यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. यावेळी आ. रोहित पवार उपस्थित होते. दरम्यान, गेल्या काही दिवसांपूर्वीच राजेंद्र फाळके यांनी राजीनामा दिल्यानंतर हे पद रिक्त झाले होते.

गेल्या ७ वर्षांपासून राजेंद्र फाळके यांच्याकडे जिल्हाध्यक्षपद होते. ऐन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर त्यांनी जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्यांच्या राजीनाम्यानंतर हे पद रिक्त झाले होते. या पदी कोणाची वर्णी लागणार याची चर्चा होती. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची घोषणा देखील झाली असून निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादीला नवीन जिल्हाध्यक्ष मिळाले आहेत. समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन पक्षाची ध्येयधोरणे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांचे विचार सर्वदूर पोहचविण्याचे कार्य दादाभाऊ कळमकर यांनी करावे, अशी अपेक्षा प्रदेशाध्यक्ष शिंदे यांनी व्यक्त केली आहे. या नियुक्तीबदल पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दादाभाऊ कळमकर यांचे अभिनंदन केले असून, त्यांच्या नेतृत्वाखाली अहिल्यानगर दक्षिण जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अधिक बळकट होईल,असा विश्वास व्यक्त केला आहे.